महाराष्ट्र शासन

सूचना का अधिकार

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/गटकतांत्रिक/तात्पुरती ज्येष्ठता सूची/ऑर्थोटिस्ट/फर/ १५५१ /२०२०, दि.१२/०२/२०२१,

प्रति,

सर्व अधिष्ठाता/अधिक्षक/अधिक्षिका/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राचार्य,

..............................,

..............................

विषय : संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमधील गट-क (तांत्रिक) संवर्गातील पदांवर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नत्या प्रदान करण्याकरीता दि. १/१/२०२० रोजीची **ऑर्थोटिस्ट / ऑर्थोटिस्ट तंत्रज्ञ / ऑर्थोटिस्ट कम प्रोस्थेटिक** तंत्रज्ञ या पदाची राज्यनिहाय तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत...

ग्रंथालय उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त असलेली शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये, आरोग्य पथकांच्या आस्थापनेवरील गट-क (तांत्रिक) संवर्गातील **ऑर्थोटिस्ट / ऑर्थोटिस्ट तंत्रज्ञ / ऑर्थोटिस्ट कम प्रोस्थेटिक तंत्रज्ञ** या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती प्रदान करण्याकरीता दि. १/१/२०२० रोजीची राज्यनिहाय तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठता सूची प्रसिध्द झाल्याची बाब तात्काळ आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व सदरील ज्येष्ठता सूचीत काही दोष/चुका/त्रुटी असल्यास त्यांची अभिवेदने मागवून ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संबंधित आस्थापना अधिकारी/कर्मचारी यांनी संचालनालयाच्या फ कार्यासनास हस्तपोच सादर करावेत. तद्नंतर प्राप्त अभिवेदनांचा विचार केला जाणार नाही, ही बाब संबंधित कर्मचाऱ्यांना अवगत करुन द्यावी. कर्मचाऱ्यांनी ज्येष्ठता सूचीबाबत काही आक्षेप असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह संस्थाप्रमुखांमार्फतच आक्षेप नोंदवावेत. कर्मचाऱ्यांनी संचालनालयास थेट अर्ज न पाठविण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांनी अभिवेदने थेट संचालनालयास सादर केल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

तात्पुरत्या स्वरुपातील ज्येष्ठता सूचीस अंतिम स्वरुप देत असताना पुढिल बाबींची दक्षता बाळगावी. कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत त्याचीच माहिती ज्येष्ठता सूचीत नमूद केली आहे हे पहावे.

उदा. प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यास प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर तदर्थ पदोन्नती दिलेली असल्यास सदर कर्मचाऱ्याचे नांव प्रयोगशाळा सहाय्यकांच्या यादीत नमूद आहे हे पहावे. २९ दिवस तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नांवाचा समावेश सदर यादीत करण्यात येऊ नये. जर अशा कर्मचाऱ्यांचे नांव ज्येष्ठता सूचीत समाविष्ट असेल तर सदर बाब संचालनालयाच्या तात्काळ निदर्शनास आणून द्यावी. काही संस्थांकडून प्राप्त माहितीमध्ये कर्मचाऱ्यांच्या केवळ जातीचे नांव नमूद करण्यात आले आहे,

त्याऐवजी जातीचा संवर्ग नमूद करावा. तसेच कर्मचाऱ्यांची अद्याक्षरे (INITIAL) नमूद न करता संपूर्ण नांव नमूद करावे. उपरोक्त यादीतील जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले असतील अथवा निधन झाले असेल त्यांच्या नांवासमोर त्याचा स्पष्ट उल्लेख करुन यादी सादर करावी. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द् विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु अथवा प्रस्तावित केली आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या नांवासमोर तसा उल्लेख करावा.

उपरोक्त तात्पुरत्या स्वरुपातील ज्येष्ठता सूचीस अंतिम स्वरुप देत असताना संस्थांकडून अचूक माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे. चुकीची वा अपुरी माहिती सादर केल्यामुळे तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कोणतीही शंका असल्यास संचालनालयाच्या फ कार्यासनातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच, सदर यादी प्रसिध्द करीत असताना कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सह संचालक,<br>
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

| गट-क (तांत्रिक) संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२० रोजीची अंतिम जेष्ठता सूची | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ऑर्थोटिक तंत्रज्ञ / आर्थोटीस्ट / आर्थोटीस्ट तंत्रज्ञ / प्रास्थेटिस्ट तंत्रज्ञ** | | | | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत संस्था | जातीचा प्रवर्ग | नियुक्ती दिनांक | सध्याच्या पदावरील नियुक्ती दिनांक | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | नियुक्ती माध्यम | जात प्रमाणपत्र आहे अथवा नाही | जात वैधता प्रमाणपत्र आहे अथवा नाही | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती प्रवर्ग | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | श्री.राजेंद्र गिरीधर निकम | आर्थोटीस्ट | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | अजा | २३-१२-१९९३ | २४-०६-२००४ | १८-११-१९६३ | ३०-११-२०२१ | दुय्यम सेवा निवड मंडळ | आहे | आहे | डिप्लोमा प्रो. व आर्थोटिस्ट इंजिनियरिंग | अ.जा | |
| २ | श्री.संजय गुलाबराव वाकडे | प्रास्थेटिस्ट | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | इमाव | २९-०८-१९९७ | ०१-०८-२००५ | २३-०७-१९६५ | ३१-०७-२०२३ | दुय्यम सेवा निवड मंडळ | आहे | आहे | डिप्लोमा प्रो. व आर्थोटिस्ट इंजिनियरिंग | इमाव | |
| ३ | श्री संतोष नामदेव वानखेडे | ऑर्थोटिक तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | इमाव | १७-०१-२००८ | १७-०१-२००८ | ०६-०५-१९८० | ३१-०५-२०३८ | सरळसेवा | आहे | आहे | एच.एस.सी. उत्तीर्ण फिजीकल मेडीसीन व रिटब्लीअेशन पदवी | खुला | |
| ४ | श्री संतोष नामदेव वानखेडे | ऑर्थोटिक तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | इमाव | १७-०१-२००८ | १७-०१-२००८ | ०६-०५-१९८० | ३१-०५-२०३८ | सरळसेवा | आहे | आहे | एच.एस.सी. उत्तीर्ण फिजीकल मेडीसीन व रिटब्लीअेशन पदवी | खुला | |
| ५ | श्री.प्रसन्नजीत शैलेंद्र झामरे | आर्थोटीस्ट तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | अजा | २९-०२-२००८ | २९-०२-२००८ | १२-०५-१९८४ | ३१-०५-२०४२ | सरळसेवा | नाही | नाही | बॅचलर ऑफ प्रो. व आर्थोटिस्ट | खुला | नियुक्ती |
| ६ | श्री शिवसेन चंद्रकांत राऊत | ऑर्थोटिक तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | अजा | ०५-०६-२०१३ | ०५-०६-२०१३ | ०१-०९-१९८६ | ३१-०५-२०३८ | सरळसेवा | आहे | आहे | एच.एस.सी.कृत्रिम अवयव योजना शास्त्र आणि अस्थिविज्ञान स्नातक | खुला | |
| ७ | श्री शिवसेन चंद्रकांत राऊत | ऑर्थोटिक तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | अजा | ०५-०६-२०१३ | ०५-०६-२०१३ | ०१-०९-१९८६ | ३१-०५-२०३८ | सरळसेवा | आहे | आहे | एच.एस.सी.कृत्रिम अवयव योजना शास्त्र आणि अस्थिविज्ञान स्नातक | खुला | |
| ८ | श्री.सचिन रामरावजी जिचकार | प्रास्थेटिस्ट तंत्रज्ञ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | इमाव | ०७-०६-२०१३ | ०७-०६-२०१३ | २७-०९-१९८५ | ३०-०९-२०४३ | स्पर्धा परीक्षा | आहे | आहे | डिप्लोमा प्रो. व आर्थोटिस्ट | स्पर्धा परीक्षा | |